दि. 8-मे-2025

प्रति,
मा. पोलिस अधीक्षक साहेब,
कार्यालय परभणी

अर्जदार - गोपाल तेजराव खरात वय 28 वर्ष
पद- क्षेत्र व्यवस्थापक
पत्ता- मु. जवळा, ता.मेहकर, जि. बुलढाणा -443303
मोबा न.- 7841001191
तर्फे स्पंदना स्पुर्ती फायनान्शियल लिमि.
शाखेचा पत्ता :नांदखेडा रोड, विद्यानगर परभणी. 431401

गैर अर्जदार- रितेश रामप्रसाद मोरे वय 20 वर्ष
पद - कर्ज अधिकारी
मु.पो. अहिरवाडी, ता. पूर्णा जिल्हा परभणी 431511
मोबा नं- 9022253854. आणि 9860050075

विषय:- गैरअर्जदार रोहित रामप्रसाद मोरे यांने आर्थिक अपहार केल्याबद्दल गुन्हा दाखल करणेबाबत.

आदरणीय महोदय,

सविनय अर्ज सादर करतो की, स्पंदना स्फुर्ती फायनान्शियल लिमिटेड कंपनी रिझर्व्ह बँकेने (एन.-09.0014) ठरवलेल्या एनबीएफसी च्या नियमांनुसार कार्यरत आहे, कंपनी चे मुख्य कार्यालय हैद्राबाद येथे असून परभणी शाखा कार्यालय वर नमूद पत्ता नुसार आहे.

कंपनीचे मुख्य कार्य महिलांना समुहा अंतर्गत त्यांच्या गरजेनुसार लहान कर्ज अल्प मुदती करिता वितरित करणे व कर्ज वितरित केल्यानंतरच्या सेवा कर्ज अधीकारीचे माध्यमातून प्रदान करणे हा आहे.

शाखा व्यवस्थापक आणि त्याचे नियोजनात व नियंत्रणात कर्ज अधिकारी कार्य करतात तर शाखा व्यवस्थापक हा क्लस्टर मॅनेजर चे खाली काम करतो, कर्ज अधिकाऱ्याचे मुख्य कार्य त्याला प्रदान केलेल्या कर्ज खातेदारांना सेवा देणे जसे कर्ज देणे, कर्जाचा हप्ता कर्ज तकत्यानुसार प्रत्यक्ष खातेदारा कडे जाऊन रोख स्वरूपात घेऊन कंपणीच्या सॉफ्टवेअर मध्ये नोंद करणे, खातेदाराला पुन्हा कर्ज देणे हे होय आणि या सर्व कामाचे नियंत्रण शाखा व्यवस्थापक करतो.

गैरअर्जदार रितेश रामप्रसाद मोरे हे कंपनीत दि 27 जानेवारी 2025 ला कर्ज अधिकारी म्हणून परभणी शाखेत रुजू झाले आणि तेव्हापासून दिनांक 04 एप्रिल 2025 पर्यंत कार्यरत होते.
गैर अर्जदार याने दिनांक 4 एप्रिल 25 ला कर्ज खात्याचे हप्ते कर्जदाराकडून गोळा केले फील्ड वरुनच पैसे घेऊन फरार झाला, संपर्क केला असता संपर्क झाला नाही आणि घरी भेट दिली असता घरी पण आला नसल्याचे घरच्यांनी सांगितले, तेव्हा आम्ही लेखी तक्रार दिली आहे, त्यानंतर त्याची तक्रार दाखल करून आमच्या अंतर्गत अंकेक्षण टीम नि त्याला दिलेली संपूर्ण फील्ड तपासणी केली असता त्याने त्याचे कार्यकाळात माहे मार्च आणि एप्रिल या दोन महिन्यात एकूण रुपये 240010 अक्षरी दोन लाख चाळीस हजार दहा एवढ्या रकमेचा अपहार केल्याचे निष्पन्न झाले तो संक्षिप्त रूपात खाली नमूद करीत आहों त्याचप्रमाणे कर्जदार आणि अपहार रक्कमेचा संपूर्ण विस्तृत तपशील सोबत जोडला आहो..
अ) एकूण चौपन्न खातेदारांच्या कर्जखात्यांचे हप्ते खातेदाराकडून गोळा केलेत मात्र शाखेत जमा न करता

08/05/2025
आवक क्र. ... पोलीस अधिक्षक कार्यालय परभणी

परस्पर अपहार केलाय, ती एकूण रक्कम ₹ 149660/- अक्षरी एक लाख एकोणपणास हजार सहाशे साठ केवळ आहे.

ब) एका कर्जदारांनी नामें दिपाली कृष्णकांत गौरे यांनी आपले कर्ज मुदत पूर्व बंद करण्याकरिता एकूण खाते बाकी रक्कम रुपये 90350 अक्षरी नव्वद हजार तीनशे पन्नास केवळ दिनांक 27 मार्च 2025 रोजी गैरअर्जदार रितेश रामप्रसाद मोरे यांचे कडे रोख पद्धतिने जमा केलेत आणि पावती घेतली मात्र गैर अर्जदाराने सदर रक्कम खतावणी न करता स्वताजवळ ठेवली.

क) अश्या प्रकारे तपासणी दरम्यान माहे मार्च आणि एप्रिल 25 या कालावधीत एकूण रुपये 240010/- अक्षरी दोन लाख चाळीस हजार दहा रुपये केवळ इतक्या रकमेची अफरातफर आढळून आली आहे, संपूर्ण तपासणी कंपनीच्या अंतर्गत परीक्षकांनी केली असून संबधित विवरण सोबत जोडले आहे.
गैर अर्जदाराने केलेल्या अपहारामुळे
आमच्या खातेदाराचे व कंपनीचे मोठे नुकसान झाले आहे आणि कंपनीच्या विश्वासार्हतेवर बाधा आली आहे, हे सर्व गैर अर्जदार रितेश रामप्रसाद मोरे याने हेतुपुरस्सर केले आहे,

तरी कृपया आम्हाला (कंपनीला) व आमच्या कर्जदाराला झालेल्या आर्थिक हानी साठी जबाबदार असणाऱ्या गैर अर्जदार रितेश रामप्रसाद मोरे यांच्याविरुध्द आर्थिक अफरातफरीचा गुन्हा दाखल करून आम्हास न्याय द्यावा हीच नम्र विनंती.
प्रतिलिपी मा.पोलिस निरीक्षक परभणी पो स्टे.
दि. 08 मे 2025

आपले नम्र,
तर्फे स्पंदना फायनान्स लिमीटेड
शाखा परभणी